नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक - ४२२००१.
NASHIKMETROPOLIS
नाशिक महानगर

# विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६.६.१ नुसार )

जा.क्र :नामप्रविप्रा/बां.प./मौ.बेहेड,ता.निफाड/ग.नं.१९०/२/भू.क्र.५३+५४/१०३/१८ /२०१८ दि. ९/४/२०१८

प्रति,
सौ. सुजाता प्रितेश छाजेड,
रा. पिंपळगांव ब., ता.निफाड,
जि.नाशिक.

विषय : **मौजे बेहेड, ता. निंफाड, जि.नाशिक** येथील **ग.नं. १९०/२** मधील **भू.क्र. ५३+५४** मधील क्षेत्र **७८८.३१ चौ.मी.** मधील क्षेत्रास **रहिवास व वाणिज्य** प्रयोजनार्थ बांधकाम मंजूरी बाबत.

संदर्भ : आपला दि.१०.११.२०१७ रोजीचा अर्ज व प्रस्ताव

मौजे बेहेड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक येथील ग.नं. १९०/२ मधील भू.क्र. ५३+५४ मधील क्षेत्र ७८८.३१ चौ.मी. क्षेत्रावरील रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त प्रस्तावास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(प्रतिभा भदाणे)
महानगर नियोजनकार,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

Mrs. S. P. Chhajed



नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
NASHIK METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY
E:\NMRDA order\Bandhkam letter.docx
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक. फोन नं. ०२५३ - २४६२४०१-०५ | www.nmrda.in

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांचे कडील दि.8/9 /२०१६ रोजीचे पत्र क्र. 963 सोबतचे
परिशिष्ट "अ" (बांधकाम परवानगी)

मौ.बेहेड, ता.निफाड येथील ग.नं. १९०/२ मधील भू.क्र.५३+५४ क्षेत्र ७८८.३१ चौ.मी.

१) मंजूर नकाशा प्रमाणेच बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) सदर विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या कालावधी पर्यंत बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील. बांधकाम सुरु केल्याबाबत प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. तदनंतर त्यापुढे आवश्यकतेनुसार विहीत मुदतीमध्ये सदर परवानगी व प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन न घेतल्यास सदरचे परवानगी व प्रमाणपत्र संपुष्टात येईल.

३) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार/जमीनमालक/विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

४) मंजूर नकाशात दर्शविले प्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम व खुली ठेवणे आवश्यक राहील.

५) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त मंजूर नकाशानुसार **रहिवास व वाणिज्य** या प्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील. इमारतीच्या वापरात बदल करावयाचा असल्यास त्यास प्राधिकरणाची पूर्व मंजूरी घ्यावी लागेल.

६) इमारतीचे जोता तपासणीसाठी अर्ज करताना अकृषिक परवानगी आणि परवानाधारक, वास्तुविशारद/अभियंता/स्ट्रक्चरल अभियंता/सुपर वायझर यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्याच प्रमाणे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना बांधकाम प्रस्तावांतर्गत जमिनीचे महसूल/भूमी अभिलेखात एकत्रिकरण/उपविभागणी केलेला अद्यावत ७/१२ उतारा/प्रॉपर्टी कार्ड व मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक राहील.

७) इमारतीचे मंजूर नकाशानुसार जोत्या पर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जोते तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता पुढील बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनधिकृत समजण्यात येऊन असे बांधकाम दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

८) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या व उंची, मंजूर बांधकाम नकाशांवर दर्शविल्या पेक्षा जास्त असता कामा नये.

९) जागेतील/जागेलगतच्या नाल्याच्या/नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार/विकासक/जमिन मालक यांची राहील.

१०) स्ट्रक्चरल इंजिनिअर/डिझायनर यांनी तयार केलेल्या Structural Design नुसार प्रत्यक्ष जागेवर विकास करणेची जबाबदारी विकासक व सुपरवायझर यांची संयुक्तिक राहील.

११) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे अर्जदार/विकासक/जमिन मालक यांचेवर बंधनकारक राहील. (नियम क्र.७.१)

१२) शासन नगर विकास विभागाकडील दि. १९/११/२००८चे निदेश क्र. टिपीव्ही-४३०८/४१०२/प्र.क्र.३५९/०८/नवि-११नुसार अर्जदार/विकासक/जमिन मालक व वास्तुविशारद यांनी बांधकाम नकाशामध्य प्रत्येक सदनिकेचे एकूण चटई क्षेत्र (Carpet area) नमूद केलेले आहे. सदर नमूद चटई क्षेत्रा (Carpet area) बाबत आकडेमाडे, गणितीय चुका इ. बाबत वास्तुविशारद व अर्जदार/विकासक/जमिन मालक संयुक्तिकरित्या जबाबदार राहतील.

१३) नियोजित इमारतीसाठी/विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची सोय आपण अश्वासित केलेल्या सक्षम प्राधिकरणाने/ग्रामपंचायतीने न केल्यास पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता अर्जदार/विकासक/जमिन मालक यांनी स्वखर्चाने प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची सुयोग्य व्यवस्था प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे बंधनकारक राहील.

Mrs. S. P. Chhajed

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण NMRDA

१४) ओला व सुक्या कचऱ्या करिता सदर जागेत स्वतंत्र कंटेनरची सोय करणे आवश्यक राहील. विघटन होण्याऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडुळ खत प्रकल्प अर्जदार /विकासक/जमिन मालक यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

१५) शासन निदेशानुसार बांधकाम करताना प्लाय ॲशचा वापर करणे बंधनकारक राहील.

१६) सौर उर्जेवर पाणी तापवण्यासाठीची यंत्रणा अर्जदार/विकासक/जमिन मालक यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

१७) विषयांकित भूखंडात Rain Water Harvesting बाबतची अंमलबजावणी करणे भूखंडधारकास बंधनकारक राहील.

१८) वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभारणे अर्जदार/विकासक/जमिन मालक यांचेवर बंधकनकारक असुन पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडाची जोपासणा यासाठी करणे आवश्यक आहे.

१९) प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ७.५ नुसार पुर्णत्वाचे अर्जदार/विकासक/जमिन मालक यांनी सादर करुन नियम क्र. ७.६ नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्या खेरीज कोणत्याही इमारतीचा भागशः/पुर्णतः वापर सुरु केल्यास अर्जदार/विकासक/जमिन मालक कारवाईस पात्र राहील.

२०) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडील अधिसूचना क्र. S.O.३९९९(E) दि-०९/१२/२०१६ मधील Appendix-XIV मधील पर्यावरणाच्या अटींची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील. व सदर अटी बंधनकारक असल्याबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२१) मोठया इमारत बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मजूरांमधील गरोदर माता, स्तनदा माता आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांकरिता शेड बांधणे, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाळणा घर इ. तात्पुरत्या सुविधा कंत्राटदार किंवा बांधकाम विकासक यांनी करणे आवश्यक आहे.

२२) अर्जदार यांनी प्रकरणी कामगार उपकरापोटी एकूण रक्कम रु.८६,१३०/- (अक्षरी शहाऐंशी हजार एकशे तीस फक्त) चलन क्र. ५३ , दि.२८/१२/२०१७ रोजी जमा केली आहे.

२३) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२४) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावा सोबतच्या बांधकाम नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्वातावा सोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण NMRDA

महानगर नियोजनकार,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

Mrs. S.P. Chhajed